अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक
अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. 19 फेब्रुवारी 2026 | वर्ष 11 वे | अंक 27 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

## ब्रम्हपुरी जिल्हा निर्मिती केवळ जनभावना नव्हे तर विकासाची गुरूकिल्ली

### प्रशासकीय सुलभता आणि दळणवळणाच्या निकषात ब्रम्हपुरीचा दावा प्रबळ




ब्रह्मपुरी/का.प्र.

चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन करून नवीन जिल्ह्याची निर्मिती करण्याचा प्रश्न गेल्या अनेक दशकांपासून ऐरणीवर आहे. शासनाच्या प्रस्तावित यादीत अनेक नावे असली, तरी भौगोलिक स्थान, प्रशासकीय सोय, शैक्षणिक प्रगती आणि रेल्वे कनेक्टिव्हिटी या सर्वच तांत्रिक निकषांवर 'ब्रह्मपुरी' हा जिल्हा निर्मितीसाठी सर्वाधिक योग्य आणि व्यवहार्य पर्याय असल्याचे समोर येत आहे. केवळ भावनिक मागणी म्हणून नव्हे, तर राज्याच्या तिजोरीवर कमीत कमी भार टाकून शाश्वत विकास साधण्यासाठी ब्रह्मपुरीचा दावा आता अधिक भक्कम झाला आहे.

**ब्रह्मपुरीच का... :** ब्रह्मपुरीच्या जिल्हा निर्मितीमागे केवळ स्थानिक अस्मिता नसून त्यामागे ठोस प्रशासकीय आणि आर्थिक कारणे आहेत. **मध्यवर्ती भौगोलिक स्थानः** ब्रह्मपुरी हे चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, गोंदिया आणि भंडारा या पाच जिल्ह्यांच्या सीमेजवळ वसलेले केंद्र आहे. नागभीड आणि सिंदेवाही या तालुक्यांसाठी हे शहर प्रशासकीयदृष्ट्या अत्यंत सोयीचे आहे. **दळणवळणाची प्रबळ बाजूः** चिमूरच्या तुलनेत ब्रह्मपुरी हे रेल्वे मार्गाने थेट नागपूर, चंद्रपूर आणि गोंदियाशी जोडलेले आहे. विकसित रस्ते आणि रेल्वे कनेक्टिव्हिटीमुळे भविष्यातील वाहतूक खर्च आणि वेळेची मोठी बचत होणार आहे. **शैक्षणिक आणि आरोग्य 'हब':** 'विदर्भाची पंढरी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ब्रह्मपुरीत नामवंत शिक्षण संस्था आणि अद्ययावत मल्टी-स्पेशालिटी रुग्णालये आधीच उपलब्ध आहेत. जिल्हा मुख्यालयासाठी आवश्यक असलेली सामाजिक संरचना येथे पूर्णतः तयार आहे. **कमी खर्चात प्रशासनः** येथे उपविभागीय कार्यालये आणि पुरेशी शासकीय जागा उपलब्ध आहे. नवीन इमारतींच्या बांधकामावर होणारा कोट्यवधींचा खर्च वाचवून प्रशासन तातडीने कार्यान्वित करता येणे शक्य आहे. (बाळकृष्ण शेळके यांच्या लेखावर आधारित)

### आता लढा आरपारचा : 'लेटरहेड' चळवळीची हाक

**ब्रह्मपुरी जिल्हा निर्मितीसाठी आता केवळ चर्चा करून चालणार नाही, तर संघटितपणे दबाव गट निर्माण करण्याची गरज तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. ब्रह्मपुरी, नागभीड आणि सिंदेवाही तालुक्यातील सर्व ग्रामपंचायती, डॉक्टर्स, वकील आणि सामाजिक संस्थांनी आपापल्या अधिकृत पत्राद्वारे (थ्रीर्प्) शासनाकडे मागणी नोंदवावी. स्थानिक संघटनांनी एकत्र येऊन राजकीय मतभेद बाजूला सारून एकाच व्यासपीठावर येणे काळाची गरज आहे. स्थानिक आमदार आणि खासदारांनी विधिमंडळात तांत्रिक बाजू मांडून या मागणीचा पाठपुरावा करणे आवश्यक आहे. 'ब्रह्मपुरी जिल्हा होणे हा केवळ आमचा अधिकार नाही, तर या संपूर्ण परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी ती एक अपरिहार्यता आहे. प्रशासकीय सोय हाच निकष असेल, तर ब्रह्मपुरीला नाकारणे अशक्य आहे.'**

## २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या ग्रा.पं.चा प्रभाग रचना कार्यक्रम जाहीर

### ग्रामीण भागात निवडणुकांचे बिगुल वाजले!

मुंबई :

राज्यातील ज्या ग्रामपंचायतींची मुदत जानेवारी २०२६ ते डिसेंबर २०२६ या कालावधीत संपत आहे, तसेच नव्याने स्थापन झालेल्या ग्रामपंचायतींच्या निवडणुकांसाठी राज्य शासनाने कंबर कसली आहे. या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग (वॉर्ड) रचनेचा अधिकृत कार्यक्रम ग्रामविकास विभागाने जाहीर केला असून, यामुळे ग्रामीण भागातील राजकीय हालचालींना आता मोठा वेग येणार आहे. ग्रामविकास विभागाच्या सहसचिव वर्षा भरोसे यांनी यासंदर्भातील आदेश जारी केले असून, संपूर्ण प्रक्रिया तहसीलदार, उपविभागीय अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांच्या देखरेखीखाली पार पडणार आहे.

प्रभाग रचनेची प्रक्रिया

प्रामुख्याने तीन टप्प्यांत विभागली गेली आहे. यात २० फेब्रुवारी २०२६'गुगल अर्थ'च्या मदतीने गावांचे नकाशे अंतिम करणे. २७ फेब्रुवारी २०२६ तलाठी आणि ग्रामसेवकांकडून प्रत्यक्ष पाहणी व प्रभाग निश्चिती. २३ मार्च २०२६ राज्य निवडणूक आयोगाकडून प्रस्तावाला अंतिम मान्यता.०७ एप्रिल २०२६प्रारूप प्रभाग रचनेची अधिकृत प्रसिद्धी. अशी प्रभाग रचनेची तीन टप्पे आहेत.

प्रशासनाने प्रभाग रचनेबाबत पारदर्शकता राखण्यासाठी नागरिकांना हरकती नोंदवण्यासाठी मुदत दिली आहे. ७ एप्रिल ते १३ एप्रिल २०२६ पर्यंत नागरिक आपल्या हरकती नोंदवू शकतील. प्राप्त हरकतींवर २१ एप्रिल २०२६ पर्यंत उपविभागीय अधिकारी सुनावणी घेतील. जिल्हाधिकारी सर्व प्रस्तावांची पडताळणी करून २८ एप्रिलपर्यंत ती निवडणूक आयोगाला सादर करतील. ४ मे २०२६ रोजी जिल्हाधिकाऱ्यां-मार्फत अंतिम प्रभाग रचना प्रसिद्ध केली जाईल.या कार्यक्रमामुळे गावोगावी आता प्रभागांच्या सीमांकनावरून चर्चेला उधाण आले असून, इच्छुकांनी मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा (Google Earth) वापर केल्यामुळे प्रभाग रचना अधिक अचूक होण्यास मदत होणार आहे.



**रयतेचे राजे, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मदिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!**



## संपादकीय...

# ज्ञानसमतेचा नवा अध्याय

केरळ राज्याने पदवीपर्यंत शिक्षण मोफत करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेत देशासमोर नवा आदर्श उभा केला आहे. शिक्षण हे केवळ वैयक्तिक प्रगतीचे साधन नसून सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे, याची जाणीव ठेवून उचललेले हे पाऊल भारतीय लोकशाहीच्या मूल्यांना अधिक बळ देणारे ठरते. स्वातंत्र्योत्तर काळापासून शिक्षणाच्या प्रसारात आघाडीवर राहिलेल्या केरळने पुन्हा एकदा आपल्या प्रगत धोरणांची प्रचीती दिली आहे.

केरळची ओळख साक्षरतेच्या उच्च टक्केवारीमुळे जगभर पोहोचली आहे. ग्रामीण–शहरी भेद न मानता, स्त्री–पुरुष समानतेचा आग्रह धरत आणि सामाजिक न्यायाच्या भूमिकेतून शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली ठेवण्याचा सातत्यपूर्ण प्रयत्न या राज्याने केला. आता पदवीपर्यंत शिक्षण मोफत करण्याचा निर्णय हा त्या प्रयत्नांचा परिपाक आहे. आर्थिक अडचणीमुळे उच्च शिक्षणापासून दूर राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही घोषणा म्हणजे आशेचा किरण आहे. भारतातील अनेक कुटुंबांमध्ये पदवी शिक्षणाचा खर्च हा मोठा प्रश्न ठरतो. फी, पुस्तके, वसतिगृह, प्रवास, पूरक अभ्यासक्रम अशा विविध खर्चांमुळे अनेक विद्यार्थी मध्येच शिक्षण सोडण्याचा निर्णय घेतात. अशा परिस्थितीत शासनाने शिक्षणाची जबाबदारी स्वीकारणे म्हणजे सामाजिक समतेच्या दिशेने उचललेले ठोस पाऊल आहे. शिक्षण मोफत केल्याने केवळ प्रवेशसंख्या वाढणार नाही, तर गुणवत्तापूर्ण शिक्षण घेण्याची संधी सर्व स्तरांपर्यंत पोहोचेल.

या निर्णयाचा दूरगामी परिणाम केवळ शैक्षणिक क्षेत्रापुरता मर्यादित राहणार नाही. आर्थिकदृष्ट्या सबल, कौशल्यसंपन्न आणि जागरूक नागरिकांची पिढी घडविण्यासाठी उच्च शिक्षण अत्यावश्यक असते. उद्योग, तंत्रज्ञान, आरोग्य, संशोधन आणि सार्वजनिक प्रशासन अशा सर्व क्षेत्रांमध्ये प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज असते. शिक्षण मोफत झाल्यास ग्रामीण व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांनाही या क्षेत्रांत संधी मिळेल. परिणामी सामाजिक विषमता कमी होऊन समताधिष्ठित विकासाला चालना मिळेल. केरळचा हा निर्णय देशातील इतर राज्यांसाठी दिशादर्शक आहे. शिक्षणावर खर्च करणे हे खर्च नसून गुंतवणूक आहे, ही भूमिका स्वीकारणे आवश्यक आहे. आजच्या जागतिक स्पर्धेच्या युगात ज्ञान, कौशल्य आणि नवोन्मेष यांनाच खरी किंमत आहे. जर शिक्षणाची दारे आर्थिक अडथळ्यांमुळे बंद राहिली, तर समाजाच्या प्रगतीची गती मंदावेल. त्यामुळे शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी ठोस धोरणांची गरज आहे. या निर्णयामागे सामाजिक बांधिलकीची जाणीव आहे. शिक्षण हे केवळ वैयक्तिक उन्नतीचे साधन नाही, तर लोकशाहीला सबल करणारे अधिष्ठान आहे.

आजच्या काळात शिक्षण हा मूलभूत अधिकार मानला जात असला तरी प्रत्यक्षात उच्च शिक्षण अनेकांसाठी स्वप्नच राहते. अशा वेळी केरळने स्वप्नांना वास्तवात उतरविण्याचा प्रयत्न केला आहे. हा निर्णय केवळ प्रशंसनीय नाही, तर प्रेरणादायी आहे. देशातील इतर राज्यांनीही या दिशेने विचार करून शिक्षणाच्या समान संधी सर्वांना उपलब्ध करून द्याव्यात, हीच अपेक्षा. केरळ राज्याचे या धाडसी आणि दूरदर्शी निर्णयाबद्दल मन:पूर्वक अभिनंदन. अशाप्रकारचा निर्णय महाराष्ट्रात होणे गरजेचे आहे. शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तनाचा दीप तेवत ठेवण्याची ही परंपरा अशीच पुढे चालू राहो, आणि ज्ञानसमृद्ध भारताच्या निर्मितीत हा निर्णय मैलाचा दगड ठरो, हीच शुभेच्छा.

ब्रम्हपुरी समाचार अंक नियमित वाचनाकरीता
www.bramhapurisamachar.com/bs
या वेबसाईटवर लॉगीन करा...

# गोगाव येथे शेतातून ट्रॅक्टरची ट्रॉली चोरी

## अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा दाखल

ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील गोगाव येथील एका शेतकऱ्याची उभी ट्रॅक्टर ट्रॉली अज्ञात चोरट्यांनी मध्यरात्रीच्या सुमारास लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी शेतकरी प्रल्हाद बाबूराव मेश्राम यांनी ब्रम्हपुरी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली आहे.

प्राप्त माहितीनुसार, गोगाव येथील रहिवासी प्रल्हाद मेश्राम (वय ५९) हे नथ्यू सदाशिव चहांदे यांची गट क्र. २९२ मधील शेती भाड्याने कसतात. या शेतात ते शासनाचे परवानगीने विटाभट्टीचा व्यवसाय आणि शेतीची कामे करतात. त्यांच्याकडे आयशर क्रं.३८० ट्रॅक्टर क्रं.एम.एच.३४ ए.पी.०१३७ क्रमांकांची सिल्हर रंगाची ट्रॅक्टर आहे. शेतीच्या कामासाठी दत्ता ऑटोमोबाईल्स ब्रम्हपुरी यांचेकडून मेश्राम यांनी ट्रॉली १२ जून २०२५ रोजी १,६०,००० रुपयांना खरेदी केली होती. १० फेब्रुवारी २०२६ रोजी नेहमीप्रमाणे दिवसभर काम आटोपल्यानंतर, संध्याकाळी ७ वाजेच्या सुमारास त्यांनी आपली 'राज हायड्रोलिक' कंपनीची लाल रंगाची ट्रॅक्टर ट्रॉली (चेसीस क्र. AL15056218) शेतातच उभी केली होती. ट्रॅक्टरचा चालक शरद ठाकरे याने ट्रॅक्टरची 'मुंडी' घरी आणून लावली, तर ट्रॉली सुरक्षित राहील या विश्वासाने शेतातच सोडली होती. दुसऱ्या दिवशी, ११ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ वाजता जेव्हा मेश्राम शेतात गेले, तेव्हा त्यांना उभी केलेली ट्रॉली जागी दिसली नाही. त्यांनी तात्काळ आजूबाजूच्या शेतात, तसेच सायगाव, पवनपार, आक्सापूर यांसारख्या लगतच्या गावांमध्ये शोध घेतला, मात्र ट्रॉलीचा कुठेही पत्ता लागला नाही. अखेर आपली अंदाजे ९०,००० रुपये किमतीची ट्रॉली चोरीला गेल्याची खात्री पटल्यानंतर मेश्राम यांनी पोलीस स्टेशन गाठले. ब्रम्हपुरी पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, रात्रीच्या वेळी शेतात ठेवलेली कृषी अवजारे आता सुरक्षित आहेत का? असा प्रश्न शेतकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे. ब्रम्हपुरी पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत असून अज्ञात चोरट्याचा शोध घेत आहेत.

# ॲड. भेंडारकर यांना 'स्मृतीगंध' कार्यक्रमाद्वारे श्रध्दांजली



नागभीड/प्रतिनिधी

ॲड. गोविंद भेंडारकर विचारमंचच्या वतीने दिवंगत ॲड. गोविंद भेंडारकर यांच्या पवित्र स्मृतीस उजाळा देण्यासाठी दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ रोजी 'स्मृतिगंध सोहळा – आठवणींचा' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार विजय वडेट्टीवार (माजी मंत्री तथा विरोधी पक्षनेते) होते. प्रमुख पाहुणे म्हणून आमदार सुधाकर अडबाले, माजी आमदार वामनराव चटप, सुभाषराव धोटे, जनमंच संघटनेचे अध्यक्ष राजीव जगताप, माजी आमदार देवराव भांडेकर, प्रसिद्ध उद्योगपती श्रावण ब्राह्मणकर, माजी संचालक बीसीयूडी गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली येथील डॉ. एन. एस. कोकोडे, नगर परिषदेच्या अध्यक्षा स्मिता खापर्डे, तसेच ब्रह्मपुरी नगरपरिषदेचे अध्यक्ष योगेश मिसार आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात उपस्थित सर्व मान्यवरांनी दिवंगत ॲड. गोविंद भेंडारकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या सामाजिक, राजकीय व जनहिताशी निगडित कार्याचा गौरव केला. आमदार वडेट्टीवार यांनी आपल्या भाषणात भेंडारकर यांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व, गोसीखुर्द प्रकल्पासाठी केलेले आंदोलन, शेतकऱ्यांच्या हक्कासाठी केलेली लढाई, अंधश्रद्धा निर्मूलनातील सक्रिय सहभाग आणि वेगळ्या विदर्भासाठी दिलेला संघर्ष यांचा विशेष उल्लेख केला. माजी आमदार वामनराव चटप यांनी भेंडारकर व इतर मान्यवरांनीही विविध आठवणी व अनुभव कथन करत त्यांच्या कार्याला उजाळा दिला. कार्यक्रमाला लेकुरवाळे मॅडम, प्राचार्य डॉ. देवीदास जगनाडे सर, डॉ. खिजेंद्र गेडाम, डॉ. सतीश दोनाडकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एन. एस. कोकोडे यांनी, सूत्रसंचालन झुरमुरे सर यांनी केले. समारोपप्रसंगी गोविंद भेंडारकर यांचे चिरंजीव ॲड. गौरव भेंडारकर यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे व उपस्थितांचे आभार मानले. शेवटी मौन पाळून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

## विनोदिनी

एक दिन चिंटू की मम्मी उसके स्कूल में देखने आई की मेरा बच्चा अच्छे से पढ़ता है या नहीं चिंटू की मम्मी क्लास के खिड़की से चिंटू को देख रही थी और इंग्लिश वाली टीचर पढ़ा रही थी तो इंग्लिश वाली टीचर 'Nature' को "नटूरे" पढ़ा रही थी ये देखकर चिंटू की मम्मी प्रिंसिपल आफिस गई और इंग्लिश वाली टीचर की शिकायत की... कि इंग्लिश वाली टीचर 'Nature' को "नटूरे" पढ़ा रही हैं.... ये देख प्रिंसिपल ने इंग्लिश टीचर को ऑफिस बुलाया और बोला "अगर तुम बच्चों को गलत पढ़ाएंगे तो बच्चों के "फटूरे" (Future) का क्या होगा...! ये सुन कर चिंटू की मम्मी का सिर चकरा गया.....!!!

# सामदा खुर्द येथे श्रीमद् भागवत कथा सप्ताह सोहळा

## माजी आमदार प्रा. अतुल देशकर यांची उपस्थिती

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्रातील सिंदेवाही तालुक्यातील सामदा खुर्द येथील समस्त ग्रामस्थ



आणि आयोजन समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या श्रीमद्भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याला ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्रातील माजी आमदार प्रा. अतुलभाऊ देशकर यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी व्यासपीठाचे पूजन करून श्रीमद्भागवत ग्रंथाचे दर्शन घेतले.

याप्रसंगी बोलताना अतुल देशकर म्हणाले की, 'अशा आध्यात्मिक कार्यक्रमांमुळे गावामध्ये एकीचे बळ वाढते आणि मनाला शांती लाभते. भागवत कथा ही मानवी जीवनाला योग्य दिशा देणारी आहे.' सामदा खुर्द येथील ग्रामस्थांनी एकत्र येऊन केलेलं हे नियोजन अत्यंत कौतुकास्पद असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यावेळी नागराज गेडाम माजी समाज कल्याण सभापती, राहुल पोरेड्डीवार माजी पंचायत समिती सदस्य, विरेंद्र जयस्वाल माजी उपसभापती, गजानन पाटील बोरकर, आशिष चितलवार, पुनेश गांडलेवार गुंजेवाही, सुनील भट्टलवार कान्हाळगाव, मुखूदा येरमे, दादाजी पाटील व्याहाड, सुभाष शेंडे, सचिन नाडमवार, सरपंच कावळे ताई, उपसरपंच राजू मडकाम , प्रा. संजय लांबे, प्रा.लालाजी अलोणे, ग्रामपंचायत सदस्य गण, तंटामुक्ती अध्यक्ष आणि मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

# आम. बंटी भांगडिया यांनी घेतले नागभीडच्या महादेवाचे दर्शन

नागभीड/प्रतिनिधी

महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर शिव टेकडी ,नागभिड येथे आमदार मा.श्री.बंटीभाऊ भांगडीया यांनी जाऊन देवाधिदेव महादेवाचे मनोभावे दर्शन घेतले. याप्रसंगी आमदार बंटीभाऊ भांगडीया समवेत माजी आमदार डॉ. नामदेवरावजी उसेंडी, भाजपा तालुका अध्यक्ष संतोषजी रडके, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष क्रिष्णा सहारे, नागभिड नगरपरिषदेचे नगरसेवक तथा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक गणेशजी तर्वेकर, अवेशजी पठाण, नगरसेवक सचिन आकुलवार, माजी जिल्हा परिषद सदस्य संजयजी गजपुरे, जहागिरी कुरेशी यांच्यासह आदी भाजपा पदाधिकारी नेतेमंडळी कार्यकर्ते भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रसंगी आम. बंटी भांगडिया यांनी नागभिड तथा ग्रामीण भागातील समस्त नागरिकांच्या जीवनात सुख, शांती आणि समृद्धी लाभो, तसेच सर्वांचे आरोग्य उत्तम राहो, अशी महादेवाच्या -भोलेनाथा च्या चरणी नम्र प्रार्थना केली. प्रसंगी भाविक भक्तांना अल्पोपहारचे वितरण करण्यात आले.

# कुर्झा (हुडकी) परिसरात बाळासाहेब ठाकरे दवाखाना सुरू करा

## शिवसेना तालुका प्रमुख नरेंद्र नरड यांची आरोग्यमंत्र्यांकडे मागणी



ब्रम्हपुरी/का.प्र.

राज्याचे आरोग्य मंत्री ना. प्रकाश आबिटकर हे गडचिरोली दौऱ्यावर असताना त्यांनी ब्रम्हपुरी येथील शिवसेना जनसंपर्क कार्यालयाला भेट दिली. या भेटीदरम्यान, शहरातील कुर्झा (हुडकी) भागात नागरिकांच्या सोयीसाठी 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे दवाखाना' त्वरित सुरू करावा, असे निवेदन शिवसेना तालुका प्रमुख नरेंद्र नरड यांनी आरोग्यमंत्र्यांना दिले.

ब्रम्हपुरी न.प.च्या अंतर्गत येणारा कुर्झा, कुर्झा हुडकी, वाल्मिक नगर, समता कॉलनी आणि टिळक नगर हा परिसर मोठा असून येथे एकही शासकीय दवाखाना उपलब्ध नाही. या भागातील नागरिकांना साध्या उपचारांसाठीही उपजिल्हा रुग्णालयावर अवलंबून राहावे लागते. जर या परिसरात बाळासाहेब ठाकरे दवाखाना सुरू झाला, तर स्थानिक नागरिकांना घरपोच आरोग्य सेवा मिळेल आणि उपजिल्हा रुग्णालयावरील गर्दीचा ताणही कमी होईल. ब्रम्हपुरी हे सध्या नागपूरनंतर विदर्भातील 'हॉस्पिटल हब' म्हणून ओळखले जात आहे. सुमारे २०० किमी अंतरावरून रुग्ण येथे उपचारासाठी येतात. शहरात तज्ज्ञ डॉक्टरांची फौज असली तरी, अनेक मोठ्या खासगी रुग्णालयांमध्ये सरकारी योजना (उदा. महात्मा फुले जन आरोग्य योजना) समाविष्ट नसल्याने गोरगरीब रुग्णांना आर्थिक फटका बसतो. अनेक रुग्णांना नाइलाजाने कर्ज काढून शस्त्रक्रिया करावी लागते किंवा उपचारासाठी नागपूरला धाव घ्यावी लागते. त्यामुळे ब्रम्हपुरीतील सर्व प्रमुख रुग्णालयांमध्ये सरकारी योजना लागू कराव्यात, जेणेकरून ग्रामीण भागातील गरिबांना मोफत उपचार मिळतील, अशी आग्रही मागणी शिवसैनिकांनी केली.

यावेळी शिवसेना लोकसभा संपर्क प्रमुख सुरेंद्रभाऊ चंदेल, उपजिल्हा प्रमुख संजय पारटवार, तालुका प्रमुख नरेंद्र नरड, उपतालुका प्रमुख कवळू पिंपळकर, युवासेना तालुका प्रमुख आकाश शेंद्रे, सुरज माकडे, सचिन भैरव, आकाश ऋषींया, लोकेश अंबादे, चेतन गुंजेकर यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक व पदाधिकारी उपस्थित होते.

# महाशिवरात्रीनिमित्य गुरव समाजाचा समाजमिलन सोहळा संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

दिनांक १५ फेब्रुवारी २०२६ ला महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर गुरव समाजातील सर्व गुरव



समाज बांधव एकत्रित येऊन समाजाची वाटचाल पुढे नेण्याच्या दृष्टीने जोशी यांचे केशव पंथाचे शिव मंदिर येथे स्नेहमिलन सोहळा पार पडला. या ठिकाणी महाअभिषेक करून, दीप प्रज्वलित करून शिव पूजा अर्चना करून सभा घेण्यात आली.

सभेचे अध्यक्षस्थान शशिकांत माडे यांनी भूषविले. प्रास्ताविक सचिन भैरव यांनी केले, समाजातील जेष्ठ नागरिक म्हणून सुरेशजी हेजीब, विठ्ठल राणे, बालाजी पंत भैरव, सुधाकर थारकर, शकुंतला रामपूरकर, आशा माडे, वनिता माडे उपस्थित होते. सर्व ज्येष्ठ नागरिकांचे या ठिकाणी पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

प्रसंगी राजू शिवनकर, रवी थारकर, गीता कस्तुरकर, सुचिता कहारे, मृणाली माडे, पूजा थारकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर अध्यक्षीय भाषणात शशिकांत माडे यांनी समाजाला एकत्रित येण्याची गरज काय आहे, समाजाला आपलं काही तरी देणं लागतं याची जाण निर्माण व्हावी, गुरव समाजाला पुढे नेण्यासाठी काय करता येईल, यावर योग्य असे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे संचालन प्रसन्न कहारे यांनी केले तर आभार प्रदर्शन सुशील थारकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी करिता रंजन कस्तुरकर, प्रवीण माडे, समीर थारकर, प्रसाद शिवणकर, सचिन थारकर, प्रशांत यावलकर, विजय घायवकर, अभिजीत दुबे, बंटी सोनटक्के, मनीष लोखंडे, पवन कत्तलकर, शुभम राणे, वैभव भावडकर, शिवा कस्तुरकर, संदीप शिवणकर, अरुण थारकर, स्वप्निल थारकर, साहिल थारकर या सर्व समाज बांधवांचे सहकार्य लाभले.

# आरटीई अंतर्गत चंद्रपुर जिल्ह्यातील १८४ शाळांमध्ये प्रवेश

## ब्रम्हपुरीतील ७ शाळांचा समावेश, १७ फेब्रुवारीपासुन अर्ज भरण्यास सुरूवात

ब्रम्हपुरी/का.प्र.

आरटीई अंतर्गत दुर्बल व वंचित घटकातील बालकांना स्वंय अर्थसाय्यित शाळा, विनाअनुदानित शाळांमध्ये इयत्ता पहिला किंवा पुर्व प्राथमिक वर्ग या स्तरावर २५ टक्के प्रवेश प्रक्रियेकरीता पालकांनी ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रीया करणे आवश्यक आहे. मुलांना चांगल्या शाळेत म्हटले तर जादा फी द्यावी लागते त्यामुळे सामान्य पालकांच्या खिशाला कात्री पडत असते. त्यामुळे आरटीई कायद्यानुसार जिल्ह्यात १६३० गोरगरीब मुला मुलींना नामांकित शाळेत मोफत प्रवेश मिळणार आहे. जिल्ह्यात एकूण १८४ शाळेत ही प्रक्रीया राबविली जाणार आहे.

खासगी शाळांना २५ टक्के जागा गरीबांसाठी राखीव ठेवणे बंधनकारक आहे. या जागांवर शाळेला कोणतीही फि घेता येत नाही. त्यांची प्रतीपुर्ती शासनाकडून शाळांना दिली जाते. ही संपूर्ण प्रक्रीया ऑनलाईन पध्दतीने प्रवेश अर्ज भरण्याची प्रक्रीया दि. १७ फेब्रुवारी पासून १० मार्च पर्यंत राबविण्यात येणार आहे.

# प्रचंड उत्साहात ब्रम्हपुरी क्रीडा महोत्सव संपन्न

## १६०० पेक्षा अधिक खेळाडूंची दिमाखदार उपस्थिती

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने १३ व १४ फेब्रुवारी रोजी आयोजित ब्रम्हपुरी क्रीडा महोत्सव येथील ने.हि. महाविद्यालयाच्या क्रिडांगणावर मोठ्या उत्साह, शिस्त आणि स्पर्धात्मक जिद्दीच्या वातावरणात यशस्वीरीत्या पार पडले. यात तब्बल १६०० च्या वर खेळाडूंनी सहभाग नोंदवत मैदानावर क्रीडाप्रेमाची दिमाखदार झलक दाखवली. चंद्रपूर, आरमोरी, गडचिरोली-भामरागड, वर्धा, भंडारा, गोंदिया, अमरावतीसह विविध भागांतून आलेल्या स्पर्धकांनी या क्रीडा महोत्सवाला व्यापक स्वरूप दिले. वयोगट ६,८,१०,१२,१६, १८ वर्षे आणि ४० वर्षांवरील या विविध वयोगटांतील मुले मुली,महिला पुरुष जेष्ठ नागरिकांनी भाग घेतला. धावणे, लांब उडी, थाळीफेक, गोळाफेक, रिले, फास्ट वॉक अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. प्रत्येक प्रकारातील प्रथम तीन क्रमांकांना मेडल्स, प्रमाणपत्र व रोख पारितोषिक देऊन खेळाडूंचा गौरव करण्यात आला. वारीयर्स स्पोर्ट्स साकोली आणि युवा पलटण बेटाळा यांनी चॅम्पियनशिप मिळविली. विशेष म्हणजे सहभागी खेळाडूंना टी शर्टचे मोफत वाटप करण्यात आले.



क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन ब्रम्हपुरी विधानसभा मतदार संघाचे आमदार विजय वडेट्टीवार यांच्या हस्ते पार पडले.अध्यक्षस्थान प्रसिद्ध शल्यचिकित्सक डॉ. लक्ष्मीकांत लाडूकर यांनी भूषवले. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ नामदेव कोकोडे, नगर परिषदेचे उपाध्यक्ष नितीन उराडे, कृष्णाजी भाईक माजी उपाध्यक्ष न प ब्रम्हपुरी, नगरसेवक राकेश पडोळे, तालुका काँग्रेसचे अध्यक्ष खेमराज तिडके, नगरसेवक पुष्पाकर बांगरे, गाजी पटेल, पोपटे सर इत्यादी मान्यवरांची उपस्थिती लाभली.

बक्षीस वितरण समारंभ प्रा सुभाष बजाज यांचे अध्यक्षतेखाली डॉ. कुंदन दुपारे यांचे हस्ते विजेत्यांचा सन्मान करण्यात आला. या प्रसंगी डॉ अमित भांडारकर सेंट लुईस अमेरिका, डॉ पंकज लडके, न.प. महिला सभापती बबिता आमले, नगरसेवक सचिन राऊत, अनुकूल शेंडे, मोंटू पिलारे, वकार खान, पुष्पाकर बांगरे त्याचप्रमाणे भूषण रामटेके, सुधान्शु अलोने, मनीष महाजन, हँडबाल चे सुरज मेश्राम इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. देविदास जगनाडे यांनी, संचालन मुनिराज कुथे यांनी तर आभारप्रदर्शन भाऊराव राऊत यांनी केले.

# 'वायगावची बालकविता' पुस्तकाचा प्रकाशन सोहळा

ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील जि. प. उच्च प्राथ. शाळा वायगाव येथील विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या कवितांचे



शिक्षक गुलाब बिसेन यांनी संपादित केलेल्या 'वायगावची बालकविता' या पुस्तकाचे प्रकाशन ब्रम्हपुरी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी रविंद्र घुबडे यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत झाले.

जि. प. उच्च प्राथ. शाळा वायगाव (ता. ब्रम्हपुरी) या शाळेतील उपक्रमशील शिक्षक यांनी 'लिहून बघू' या उपक्रमातून मागील दोन वर्षांपासून मुलांना वाचनासोबत लेखनाची गोडी लावली आहे. यातून विद्यार्थी कविता लेखनाकडे वळले. याच उपक्रमातून फुललेल्या कवितांचा वायगावची बालकविता हा कवितासंग्रह आहे. या कविता संग्रहात इयत्ता पाचवी ते आठवीच्या १४ विद्यार्थ्यांच्या २६ कवितांचा समावेश आहे. या संग्रहाला साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त साहित्यिक डॉ.सुरेश सावंत यांची प्रस्तावना आहे. ३३ व्या झाडीबोली साहित्य संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक प्राध्यापक डॉ. धनराज खानोरकर यांनी शुभेच्छा देऊन आशीर्वादित केले आहे. प्रसिद्ध साहित्यिक डॉ.श्रीकांत पाटील यांनी या कवितासंग्रहाची पाठराखण केली आहे.

यावेळी पंचायत समिती ब्रम्हपुरीचे गटविकास अधिकारी रविंद्र घुबडे, गटशिक्षणाधिकारी डॉ. विद्या शेळके मॅडम, केंद्रप्रमुख वाळके मॅडम, सरपंच गुरूदेवजी तुपट, उपसरपंच चक्रधर ढोक, मुख्याध्यापक धनराज भोयर, शाळा व्यव. समिती अध्यक्ष प्रमोद काटलाम, रामेश्वर मन्हसकोल्हे, सर्व शिक्षक आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# एलएमबी स्कुलच्या विद्यार्थ्यांचे लोकमत राज्यस्तरीय स्पर्धेत प्राविण्य






ब्रम्हपुरी/का.प्र.

फिट इंडिया मुव्हमेंट (Fit India Movement) ही देशातील नागरिकांना निरोगी आणि शारीरिकदृष्ट्या सक्रिय राहण्यासाठी प्रोत्साहित करणारी एक राष्ट्रव्यापी मोहीम आहे. दैनंदिन जीवनात फिटनेस, वर्तन बदल रोजच्या कामात व्यायाम आणि खेळ यांचा समावेश असणे काळाजी गरज आहे. काळाची गरज लक्षात घेऊन एल.एम.बी. स्कुलने लोकमतच्या फिट इंडिया मुव्हमेंट स्पर्धेत सहभाग घेतला..

'लोकमत' ने विविध स्पर्धा घेऊन एल. एम. बी. स्कुलच्या विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविला. फिट इंडिया मुव्हमेंटद्वारे अंडर १४ वयोगटामध्ये Skating Long race and Short race स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत दुसरा क्रमांक शुभम निरंकारी, रक्षीत आंबोरकर तर तृतीय क्रमांक आरोही सरकार, वंश ठावरी यांनी प्राप्त केला. तसेच अंडर १६ वयोगटातील दुसरा क्रमांक सर्वेश ठावरी तर तृतीय क्रमांक अग्रीम दहिकार यांनी संपादित केला. तर ओपन विदर्भ लेवलमधील invitational roller speed skating championship 2026 अंडर १२ वयोगटामध्ये आयुषी लाडे हिने प्राविण्य प्राप्त केले.

प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांना लोकमत तर्फे, रजत आणि कांस्य पदक प्रदान करून विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. एल.एम.बी. स्कुल नेहमीच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तत्पर असते. आजच्या धकाधकीच्या काळात आपली जीवनशैली शारीरिक, मानसिकदृष्ट्या अधिक सक्रिय असणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल एल. एम. बी. एज्युकेटर यांनी भरभरून अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# महाराष्ट्र विद्यालयात वाहतूक जनजागृती व निबंध स्पर्धा संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

वाढत्या रस्ते अपघातांना आळा घालण्यासाठी आणि विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक नियमांची जागरूकता निर्माण करण्यासाठी, दिनांक १७ फेब्रुवारी २०२६ रोजी महाराष्ट्र उच्च माध्यमिक विद्यालय, पिंपळगाव भोसले येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ब्रम्हपुरी पोलीस स्टेशनच्या वतीने आणि पोलीस निरीक्षक प्रमोद बानबले यांच्या मार्गदर्शनाखाली 'वाहतूक सुरक्षा: नियम, दुष्परिणाम व उपाययोजना' या विषयावर निबंध स्पर्धा व मार्गदर्शन सोहळा उत्साहात पार पडला.

या निबंध स्पर्धेत विद्यालयातील एकूण ६० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून वाहतूक नियमांचे महत्त्व आपल्या लेखणीतून मांडले. स्पर्धेतील विजेत्यांना पोलीस प्रशासनाच्या वतीने सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यात स्पर्धेचे निकाल मध्ये प्रथम क्रमांक कु. उन्नती संदीप दोनाडकर (वर्ग ९ वा अ), द्वितीय क्रमांक कु. निधी प्रशांत कांबळे (वर्ग ५ वा) तर तृतीय क्रमांक कु. अनुष्का विजय दोनाडकर (वर्ग ९ वा अ) हिने पटकाविला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक ओमप्रकाशजी बगमारे सर होते. शाळेतील ३०० विद्यार्थी, विद्यार्थिनी आणि नागरिकांच्या उपस्थितीत विजेत्यांचा सत्कार करण्यात आला.

# आईच मुलांची पहिली गुरू: संस्कारातूनच घडेल प्रगत राष्ट्र!

## स्व. अशोकजी सिंहल स्मृती व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प संपन्न

ब्रह्मपुरी/का.प्र.

एकात्मता शिक्षण संस्था द्वारा संचालित, हिंदू ज्ञान मंदिर ब्रह्मपुरी येथे आयोजित स्व.




अशोकजी सिंहल स्मृती व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प दि. १३ फेब्रुवारी २०२६ रोजी उत्साहात संपन्न झाले. याप्रसंगी 'नैतिक मूल्य व संस्कारांचे महत्त्व' या विषयावर मार्गदर्शन करताना विश्व हिंदू परिषदेचे केंद्रीय सहमंत्री गोविंदजी शेंडे यांनी समाजातील संस्कारांच्या भूमिकेवर प्रकाश टाकला. व्याख्यानमालेचे मुख्य वक्ते गोविंदजी शेंडे यांनी आपल्या ओघवत्या शैलीत संस्कारांचे महत्त्व विषद केले. ते म्हणाले, 'आई ही मुलांची पहिली गुरू असते. मुलांवर उत्तम संस्कार रुजवण्याची सर्वात मोठी जबाबदारी कुटुंबाची आणि विशेषत: मातेची असते. जर मुले संस्कारी झाली, तर समाजात आपोआपच नैतिक मूल्यांची जोपासना होईल.'

गोविंद शेंडे यांनी आपल्या भाषणात काव्यपंक्तींचा आधार घेत सावध केले की, 'माता ठाण यदी ले तो, श्री राम को आना होगा, समझोता कर ले गर संस्कारो से, रावण भी फिर आयेगा.'

त्यांनी पुढे प्रतिपादन केले की, भारतामध्ये अनादी काळापासून मूल्यशिक्षणाची परंपरा आहे. समाज संस्कारी झाला तरच देश प्रबळ होईल आणि त्याचे सकारात्मक परिणाम संपूर्ण ािक्षााार होतील. या व्याख्यानमालेला दि. ११ फेब्रुवारीपासून सुरूवात झाली. विविध क्षेत्रांतील दिग्गजांनी यात मार्गदर्शन केले. प्रथम पुष्प डॉ. नितीनजी खर्चे यांनी 'एकात्म मानव दर्शन' या विषयावर राष्ट्र, समाज आणि निसर्गाशी एकरूपता हीच खरी एकात्मता असल्याचे सांगितले. द्वितीय पुष्प: श्रीधरराव गाडगे यांनी राष्ट्रसाधनेत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे योगदान किती महत्त्वाचे आहे, यावर आपले मत मांडले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष-स्थानी मनोजजी हंबर्डे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून गडचिरोली येथील सामाजिक कार्यकर्ते सुशिलजी हिंगे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन मृणाली माडे यांनी तर पाहुण्यांचा परिचय राधिका जाणी यांनी करून दिला. उपस्थितांचे आभार हर्षा आबदेव यांनी मानले. 'वंदे मातरम'च्या राष्ट्रभक्तीपर गीताने कार्यक्रमाची सांगता झाली. या व्याख्यानमालेला परिसरातील नागरिक आणि शिक्षणप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**वाचाल तर वाचाल..**

# ब्रम्हपुरी नगर परिषदच्या कारभारात पारदर्शकता आणा

## सभांचे चित्रीकरण आणि ठराव संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याची नागरिकांची मागणी

ब्रम्हपुरी/का.प्र.

नगरपरिषदेच्या कामकाजात पारदर्शकता असावी आणि सामान्य नागरिकांना प्रशासकीय निर्णयांची माहिती मिळावी, यासाठी ब्रम्हपुरी नगरपरिषदेच्या सभांचे ठराव, कार्यवृत्त (Minutes) आणि व्हिडिओ चित्रीकरण अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावे, अशी आग्रही मागणी नागरिकांनी मुख्याधिकाऱ्यांकडे केली आहे.

नागरिकांनी आपल्या मागणीत 'महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५' मधील तरतुदींचा हवाला दिला आहे. कलम ८१ (१२) यानुसार सभांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करणे आणि ठराव व कार्यवृत्त ठराविक कालावधीत संकेतस्थळावर उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. नियम ३९ व ४० (१९६६ अधिनियम) यानुसार कार्यवृत्ताची (Minutes) रीतसर नोंदणी करणे आणि ती जतन करणे आवश्यक आहे.

प्रत्येक सभेचे निर्णय आणि सविस्तर ठराव नगरपरिषदेच्या अधिकृत वेबसाईटवर अपलोड करावेत. सभेमध्ये नेमकी काय चर्चा झाली, हे समजण्यासाठी व्हिडिओ रेकॉर्डिंग सार्वजनिक करावे. सभेचे कार्यवृत्त निश्चित कालावधीतच प्रसिद्ध करण्यात यावे. नगरपरिषदेच्या निर्णय प्रक्रियेत नागरिकांचा सहभाग वाढावा आणि प्रशासनावरील विश्वास दृढ व्हावा, हा या मागणीमागचा मुख्य उद्देश आहे. 'नगरपरिषदेच्या कामकाजाची माहिती सुलभपणे उपलब्ध झाल्यास प्रशासकीय दिरंगाईला लगाम बसेल आणि पारदर्शकता वाढेल,' असे मत नागरिकांनी व्यक्त केले आहे.

आता या मागणीवर नगरपरिषद प्रशासन काय पावले उचलते आणि कायद्याची अंमलबजावणी कधी सुरू होते, याकडे ब्रम्हपुरीकरांचे लक्ष लागले आहे.

... QUOTES ...

"We cannot solve problems with the kind of thinking we employed when we came up with them."

- Albert Einstein

चा
रो
ळी

तसा तुझ्यासोबत हॉटेलात
मी नेहमीच आनंदी असतो...
'बील मी देते' तू म्हणताच,
मी विशेष आनंदी होतो...

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

# निलज शेत शिवारात १३ मोटारपंपांची वायर चोरी

## तालुक्यात संघटीत टोळी सक्रीय

ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील निलज शेतशिवारात वैनगंगा नदीवर शेती पिकांच्या सिंचनासाठी बसवलेल्या वीज मोटारींच्या केबल वायर अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी (दि.१३फेब्रुवारी) मध्यरात्री घडली. यात सुमारे तेरा शेतकऱ्यांचे दीड लाखाचे नुकसान झाले आहे.

निलज गावालगतच्या वैनगंगा नदीवर धान, मका, भाजीपाला पिकांसाठी मोठ्या प्रमाणात विद्युत मोटारी बसविण्यात आल्या आहेत. या मोटारींतून पाईपलाईनद्वारे शेतात पाणीपुरवठा केला जातो. मात्र शनिवारी मध्यरात्री अज्ञातांच्या टोळीने कटर मशीनच्या सहाय्याने मोटारींच्या केबल वायर कापून चोरून नेले. ही घटना शनिवार दि.१४ फेब्रुवारी सकाळी शेतकरी शेतात गेले असता उघडकीस आली. मोटारी बंद झाल्याचे लक्षात येताच शेतकऱ्यांनी बसविलेल्या मोटारपंप परिसरात पाहणी केली असता सर्वत्र केबल वायर कापलेली व गायब असल्याचे दिसले. यानंतर तत्काळ ब्रम्हपुरी पोलिस ठाण्यात घटनेची माहिती दिली.

विशेष म्हणजे दोन दिवसांपूर्वी हळदा गावातही वैनगंगा नदीवर बसविलेल्या विद्युत मोटारींच्या केबल वायरची चोरी झाली होती. त्या प्रकरणातील चोरट्यांचा अद्याप तपास लागलेला नसताना पुन्हा निलज येथे मोठ्या प्रमाणात चोरी झाल्याने संघटित टोळी सक्रिय असल्याचा संशय शेतकऱ्यांनी व्यक्त केला. या चोरी प्रकरणी विनोद चौधरी, दशरथ चौधरी, दशरथ राऊत, कार्तिक भुते, व्यंकट पिलारे, हेमराज भुते, योगराज पिलारे, मनोज पिलारे, विनायक ढोरे, शंकर भुते, बंडू डहाके, दुर्गेश भर्रे, एकनाथ भर्रे या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.

# हळदा शेतशिवारात चोरट्यांचा धुमाकूळ, ३.२४ लाखांचा मुद्देमालाची चोरी

ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील हळदा येथील वैनगंगा नदीघाटावर अज्ञातांनी मोठी चोरी केली असून, तब्बल १३ शेतकऱ्यांच्या सिंचन पंपांच्या ८१०० फूट तांब्याच्या तारा (केबल) कटरने कापून चोरून नेल्या आहेत. या धाडसी चोरीमुळे शेतकरी वर्गात संतापाची लाट पसरली असून अंदाजे ३ लाख २४ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.

हळदा येथील रहिवासी अरुण आत्माराम भोयर (वय ५०) आणि गावातील इतर सुमारे १५० शेतकऱ्यांनी वैनगंगा नदीपात्रात शेतीला पाणी पुरवण्यासाठी मोटर पंप बसवले आहेत. उन्हाळी धानाचे रोवण सुरू असल्याने १२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ६ वाजल्यापासून पंप सुरू होते. संध्याकाळी ६ च्या सुमारास वीज पुरवठा खंडित झाल्याने शेतकरी पंप बंद करून घरी परतले होते. दुसऱ्या दिवशी, १३ फेब्रुवारी रोजी सकाळी ६:३० वाजता अरुण भोयर नदीवर गेले असता, स्टार्टर दाबूनही मोटर सुरू झाली नाही. त्यांनी नदीपात्रात जाऊन पाहिले असता, मोटरपासून स्टार्टरपर्यंतची ७०० फूट तांब्याची तार कटरने कापलेली दिसली. ही माहिती गावात पसरताच इतर शेतकऱ्यांनीही नदीकडे धाव घेतली. तपासणी केली असता, गावातील अन्य १२ शेतकऱ्यांच्या तारा देखील चोरीला गेल्याचे स्पष्ट झाले. चोरट्यांनी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने प्रति फूट ४० रुपये किमतीचा तांबा वायर अंदाजे किंमत ३ लाख २४ हजार रुपये चोरी केला आहे. ब्रम्हपुरी पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.











# सीएसआर फंडाचे आमिष दाखवून व्यावसायिकास लूटले

## लघू व्यावसायिकांना ६१ लाखांचा गंडा

ब्रह्मपुरी/का.प्र.

कमी व्याजदरात आणि दीर्घ मुदतीसाठी ५० कोटी रुपयांचे कर्ज 'सीएसआर' (CSR) फंडातून मिळवून देण्याचे आमीष दाखवून लघु व्यावसायिकांना ६० लाख ९६ हजार रुपयांचा गंडा घातल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी ब्रह्मपुरी पोलिसांनी मुख्य आरोपींसह त्यांच्या साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून दोन आरोपी अद्याप फरार आहेत. फिर्यादी सीमा संजय डोंगरे (रा. वडसा, जि. गडचिरोली) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी मोहन बिसन गजबे (रा. ब्रह्मपुरी), सुहास महादेव दुधे (रा. वानाडोंगरी, नागपूर) आणि मीना प्रवीण गाडेकर (रा. टिटवाळा, जि. ठाणे) यांनी संगनमत करून हा कट रचला.

आरोपींनी ५० कोटी रुपयांच्या कर्जासाठी १ टक्का 'स्टॅम्प ड्युटी' भरावी लागेल असे सांगून फिर्यादी आणि इतर लघु व्यावसायिकांकडून वेळोवेळी एकूण ६० लक्ष ९६ हजार रुपये स्वत:च्या बँक खात्यात वळवून घेतले. मोठ्या कर्जाच्या आशेने व्यावसायिकांनी ही रक्कम भरली, मात्र प्रत्यक्षात एक रुपयाचेही कर्ज मिळाले नाही. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी ब्रह्मपुरी पोलीस स्टेशन गाठले. २६ जानेवारी २०२४ रोजी या प्रकरणी अधिकृत गुन्हा दाखल करण्यात आला असून, प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता या तपासाची सूत्रे आता आर्थिक गुन्हे शाखा, चंद्रपूर यांच्याकडे सोपवण्यात आली आहेत.

गुन्हा दाखल झाल्यापासून आरोपी सुहास महादेव दुधे आणि मीना प्रवीण गाडेकर हे फरार आहेत. पोलीस पथके त्यांचा कसून शोध घेत आहेत. या फसवणुकीच्या जाळ्यात आणखी काही लोक अडकले असण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. खासगी व्यक्तीकडून किंवा मध्यस्थाकडून कर्ज मिळवून देण्यासाठी आगाऊ रक्कम (Processing Fee/Stamp Duty) मागितली जात असल्यास सावध राहावे आणि अशा प्रलोभनांना बळी पडू नये, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# सोंद्री येथे महाशिवरात्रीनिमित्य महापूजा व भक्तीगीतांची मेजवाणी

ब्रम्हपुरी/का.प्र.

पवित्र महाशिवरात्री पर्वाचे औचित्य साधून सोंद्री येथे समस्त गावकरी आणि भाविक भक्तांच्या उपस्थितीत 'महाशिवरात्री महापूजा' अत्यंत मंगलमय वातावरणात पार पडली.

परंपरेनुसार भगवान शंकराचा अभिषेक आणि विधिवत पूजन करून परिसराच्या सुख-समृद्धीसाठी साकडे घालण्यात आले. या धार्मिक सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे परिसरातील विविध गावांतील आजी-माजी लोकप्रतिनिधींनी उपस्थिती लावली. सोंद्री येथील भजनी मंडळाने आपल्या भक्तीगीतांनी कार्यक्रमात चैतन्य भरले.

# समाजसेवक गोविंदा मेश्राम यांचे दुःखद निधन

ब्रह्मपुरी/का.प्र.

समाजसेवा, धार्मिक कार्य आणि ग्रामविकासासाठी आपले आयुष्य समर्पित करणारे खरकाडा येथील ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व गोविंदा सदाशिव मेश्राम यांचे दि. १७ फेब्रुवारी २०२६ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण ब्रह्मपुरी तालुक्यात आणि खरकाडा परिसरात शोककळा पसरली असून, एका निस्वार्थी आणि आदर्श नेतृत्वाचा अंत झाला आहे.



गोविंदा मेश्राम हे केवळ एक नाव नसून, समाजसेवेचा एक वसा होते. आयुष्यभर राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांचा वारसा जपत त्यांनी तन-मन-धनाने गुरुदेव सेवामंडळाचे कार्य केले. खरकाडा येथील बारा ज्योतिर्लिंग महादेव मंदिरात ३० वर्षांपूर्वी महाशिवरात्र यात्रेची मुहूर्तमेढ रोवण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. आज ही यात्रा परिसराची सांस्कृतिक ओळख बनली आहे. ते ने.हि. विद्यालयातील सहा. शिक्षक लक्ष्मण मेश्राम यांचे वडील होत.






Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404